( प्रेस नोट )

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला.
दिनांक :– ३०/०४/२०२६.

| | | |
|---|---|---|
| १. | युनिट चे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला. |
| २. | आरोपीचे नाव पद व कार्यालयाचा पत्ता | महीला आरोपी लोकसेवक – श्रीमती जया पांडुरंग इंगोले वय ४९ वर्ष पद– कनष्ठि अभियंता, बांधकामा विभाग, पंचायत समीती अकोला रा. महात्मा फुले नगर, मोठी उमरी, अकोला ता. + जि. अकोला. |
| ३. | घटना तारीख वेळ | दि. ३०.०४.२०२६ चे ११:२७ ते १२:०४ वा. दरम्याण. |
| ४. | मागणी केलेली लाच रक्कम | ३०,०००/–रूपये. |
| ५. | स्विकारलेली लाच रक्कम | ३०,०००/–रूपये. |
| ६. | घटनास्थळ | बांधकाम विभाग, कार्यालय, पंचायत समीती, अकोला |

थोडक्यात हकिकत :–

अश्या प्रकारे आहे की, यातील तक्रारदार यांनी दिनांक २७.०४.२०२६ रोजी ला.प्र.वि कार्यालय, अकोला येथे येवून तक्रार नोंदविली की, तक्रारदार यांनी सन २०२४ मध्ये तयार केलेल्या ११० मिटर सिमेंट कॉक्रीट रस्त्याच्या कामाचे देयक काढून देण्याचा मोबदला म्हणून महीला आरोपी लोकसेवक यांनी तक्रादार यांना ३०,०००/–रूपये लाचेची मागणी केली, असून तक्रादार मआलोसे यांना देण्याची ईच्छा नसल्यामुळे त्यांनी तक्रार दिली.

दिनांक २८.०४.२०२६ रोजी शासकीय पंचा समक्ष मआलोसे यांची राहते घरी महात्मा फुले नगर, मोठी उमरी अकोला येथे पडताळणी कार्यवाही आजमाविली असता मआलोसे श्रीमती जया इंगोले यांची तक्रारदार यांना केलेल्या कामाचा मोबदला म्हणून ३०,०००/–रू. लाच मागणी केल्याचे पडताळणी कार्यवाही दरम्याण निष्पन्न झाले.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कार्यवाही मध्ये मआलोसे यांनी लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक ३०.०४.२०२६ रोजी दोन्ही शासकीय पंचा समक्ष पंचायात समिती अकोला येथे सापळा कार्यवाही आजमविण्यात आली असता मआलोसे श्रीमती जया इंगोले वय ४९ वर्ष पद– कनष्ठि अभियंता, बांधकाम विभाग पंचायत समीती अकोला रा. महात्मा फुले नगर, मोठी उमरी, अकोला ता. + जि. अकोला. यांनी तक्रारादाराकडून ३०,०००/–रू. लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात असून त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम अंतर्गत पोलीस स्टेशन सिटी कोतवाली अकोला येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदर कार्यवाही ही, मा.श्री. बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र अमरावती श्री. सचिंन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र अमरावती. यांचे मार्गदर्शनाखाली मिलींदकूमार अ. बहाकर पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि अकोला, मपोहवा. अर्चना घोडेस्वार, भाग्यश्री काशीद पो.हवा दिगांबर जाधव, अविनाश पाचपोर, पो. अंम. असलम शहा, नितीन पाटील, चालक नफीस शेख यांनी पार पाडली

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी/लोकसेवक अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी ईसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो अकोला येथील खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

ऑफिस फोन नं :– 0724-2415370
मोबाईल क्र :– 9403801064
टोल फ्रि क्रमांक :– 1064

अॅन्टी करप्शन ब्युरो
अकोला

( मिलींदकूमार अ. बहाकर )
पोलीस उप–अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला.